**<u>प्रेसनोट</u> : दि.०९/०३/२०१९**

**फक्त दोन तासात : मार्केटयार्ड पोलीस स्टेशन कडील अधिकारी व कर्मचारी यांचे प्रभावी शोध मोहिमेमुळे हरविलेली कु.रेणूका ही चार वर्षाची मुलगी परत आई-वडीलांचेकडे सुर्पुतकरण्यात आले बाबत...**

---

आज रोजी दुपारी १६.३० वा.चे सुमारास इसम नामे नरेश रामचंद्र घटकरी, वय ३५ वर्षे, रा. स.नं.५७०, आंबेडकरनगर,मार्केटयार्ड,पुणे यांनी मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे समक्ष येवून त्यांची चार वर्षाची लहान मुलगी नामे कु.रेणूका नरेश घटकरी ही दुपारी १३.३० वा. पासून राहते घराचे बाहेर खेळत असताना, बेपत्ता झाली असलेबाबत कळविले.

महिला जागतिक दिनाचे दिवशीच लहान चार वर्षाची मुलगी हरविल्याचे कळालेमुळे मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी तक्रार घेत बसण्याचे सोपस्कर करुन वेळ जाणेपेक्षा प्रकरणांचे गांभिर्य पाहून तसेच लवकरच अंधार पडणार असलेमुळे, लहान मुलीचे बाबतीत कोणताही अनुचित प्रकार घडू नये या काळजीने मार्केटयार्ड पोलीस स्टेशनचे शेजारील सर्व पोलीस स्टेशनला याबाबत माहिती देवून तसेच तात्काळ स्टाफला पाचारण करुन त्यांच्या टीम तयार करुन, महिला कर्मचारी मदतीस देवून सर्वांना हददीत पाठवून शोध घेतला असता, यातील हरविलेली मुलगी नामे रेणूका, वय चार वर्षे ही मार्केटयार्ड धान्य बाजार गेट नं.४ येथे एकटीच भेदरलेल्या अवस्थेत मिळून आली. तिस तात्काळ मार्केटयार्ड पोलीस स्टेशन येथे आणून मुलीचे वडील नामे नरेश रामचंद्र घटकरी यांचे ताब्यात सायंकाळी १८.३० वा. सुखरुप सुर्पुद करण्यात आले आहे.

या कारवाईत श्री.एस.एस. निंबाळकर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली एन.आर. कोंडे, पो.हवा.३९५२, एम.डी.साळुंके, पो.हवा.४९८७, मार्शल पोलीस कर्मचारी तोडकर, पो.शि.९१९४, माळी, पो.शि.८६७२ तसेच महिला पोलीस कर्मचारी एस.पी.निकम,म.पो.शि.६४, के.डी.माडजे, म.पो.शि. २७१२ व एस.जी.मुठे, म.पो.शि.९४३२ यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला आहे.

महिला जागतिक दिनाचे दिवशी कु.रेणूका वय चार वर्षे हिस फक्त दोन तासात सर्व परिसर पिंजून पोलीसांनी शोधून काढलेमुळे मार्केटयार्ड परिसरातील महिला मंडळातील सदस्यांनी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.निंबाळकर यांचेसह मार्केटयार्ड पोलीस स्टेशन कडील सर्व पोलीस स्टाफचे अभिनंदन केले आहे.


POLICE STATION VISIT